“ ज्ञानाची शेती ”

# कलमी भाजीपाला पीक उत्पादन तंत्रज्ञान

**श्री. यशवंत जगदाळे.**

**प्रकल्प प्रमुख, भाजीपाला गुणवत्ता केंद्र,**

**कृषी विज्ञान केंद्र, बारामती**

भाजीपाला गुणवत्ता केंद्रामधून उत्तम प्रतीची रोग व कीडविरहीत रोपे तयार करून महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांना पुरविली जातात. उच्च डच तंत्रज्ञानावर आधारित संरक्षित शेतीमध्ये भाजीपाला लागवड पद्धती व शेतकरी बांधवांचा उत्पादन खर्च कमी करून उत्पन्न कशा प्रकारे वाढवता येईल यावर शेतकरी बांधवांना मार्गदर्शन करीत आहे.रोपे तयार करताना नेदरलँड मधील तज्ञांचे मार्गदर्शन घेतले जाते त्यामुळे रोपांची पांढऱ्या मुळांची वाढ भरपूर प्रमाणात झालेली असते व यामध्ये कलम तंत्रज्ञानाचाही वापर केला जातो.

❖ **भाजीपाला कलम तंत्रज्ञान ओळख :-**

१५६० ई.स. पूर्व मध्ये चीन या देशात भाजीपाला कलम तंत्रज्ञानाचा उगम झाला. यानंतर युरोप, मध्य पूर्व, उत्तर आफ्रिका, मध्य अमेरिका आणि आशियातील इतर देशांमध्ये व्यावसायिक स्वरुपात हे तंत्रज्ञान वापरले जाऊ लागले.

१९२० पासून जपान व कोरिया या देशांमध्ये जमिनीतून भाजीपाला रोपांच्या मुळावर येणाऱ्या बुरशीजन्य रोग जसे की फ्युजेरिअम, पिथीअम, व निमॅटोड (सुत्रकृमी) यांच्यापासून संरक्षण करणेकरिता भाजीपाला कलम तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येऊ लागला.

या तंत्रज्ञानामध्ये सुरुवातीला गावठी किवा जंगली रोप (रूटस्टॉक) याची निवड योग्यपद्धतीने करणे गरजेचे असते व संकरित वाण (सायन) की ज्या भाजीपाल्यांचे उत्पादन व्यापारी पद्धतीने शेतकरी बांधवांना आपल्या शेतात घ्यावयाचे आहे. या दोघांची निवड झाली की कलम बांधण्याच्या ज्या विविध पद्धती आहेत त्याचीही माहिती आवश्यक असते. व्यापारी तत्वावर क्लेफ्ट कलम, टॉप इन्सर्शन कलम, भेट कलम, व पाचर कलम या विविध कलम पद्धतींचा भाजीपाला पिकामध्ये कलमी रोपे तयार करण्यासाठी उपयोग केला जातो.

ज्ञानाची शेती फायद्याची व आरोग्यदायी..!

भाजीपाला गुणवत्ता केंद्र मागील सहा वर्षांपासून टोमॅटो , वांगी , कलिंगड , खरबूज , वेलवर्गीय भाजीपाला व ढोबळी मिरची या पिकांमध्ये हे कलमी भाजीपाला पीक उत्पादन तंत्रज्ञान वापरत आहे. आत्तापर्यंत भाजीपाला गुणवत्ता केंद्राने 20 लाखा पेक्षा अधिक कलमी रोपे विशेष करून वांगी, ढोबळी मिरची व टोमाटो रोपे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना पुरविली आहेत. तसेच मागील वर्षापासून ब्रीमॅटोची कलमी रोपे म्हणजेच एकाच रोपावर वांगी आणी टोमॅटोचे उत्पादन घेतले जाते यालाच द्विपीक पद्धती असे सुद्धा म्हणाले जाते आणी पोमॅटो म्हणजेच बटाटा आणी टोमॅटोचे एकाच झाडावर उत्पादन घेणे. महाराष्ट्रातील रोपवाटिका धारकाना याचे प्रशिक्षण सुद्धा दिले जाते.



❖ **भाजीपाला कलम तंत्रज्ञानाचे शेतकरी बांधवांना होणारे फायदे :**

1) कलम तंत्रज्ञान वापरून तयार केलेल्या रोपांमध्ये मातीतून प्रादुर्भाव करणाऱ्या रोगास ही रोपे प्रतिकारक्षम असतात.
2) कलम केलेले रोप मातीतून येणाऱ्या सुत्रकृमींना बळी पडत नाही.
3) कलमी भाजीपाला रोपांमध्ये जैविक व अजैविक ताण सहन करण्याची क्षमता अधिक असते.
4) कलमी भाजीपाला रोपांमध्ये पांढऱ्या मुळांची भरपूर वाढ होत असल्यामुळे मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचा पुरवठा अधिक होतो.
5) कलम तंत्रज्ञानामुळे भाजीपाला पिकासाठी खतांची मात्रा व पाणी कमी लागते.
6) कलम तंत्रज्ञानामुळे फळांचा आकार, उत्पादन ३०-३५ टक्के वाढते व गुणवत्ता सुधारते.
7) पिकाचा उत्पादन देण्याचा कालावधी कमीतकमी ३५ दिवस आणी जास्तीत जास्त ६० दिवसापर्यंत वाढतो .

महाराष्ट्रामध्ये या कलमी भाजीपाला तंत्रज्ञानाची सुरुवात प्रथमच या गुणवत्ता केंद्रामार्फत केली गेलेली आहे आणि यासाठी तांत्रिक मदत नेदरलँड येथील तज्ञांकडून घेतली जात आहे.

❖ **भाजीपाला कलम तंत्रज्ञान प्रात्याक्षिके आतापर्यंत ज्या शेतकऱ्यांच्या शेतावर राबविण्यात आलेली आहेत त्यांची मते :**

1) रोपे पूर्णलागवडीनंतर फक्त १ % च रोपांची मर आढळून आली.
2) पांढऱ्या मुळांची वाढ जास्त झाल्यामुळे रोपे लवकर वाढीस लागतात व उत्पादन लवकर चालू होते.
3) भाजीपाला पिकावर बुरशीजन्य रोगांचा ०.५ – १ % च प्रादुर्भाव आढळून आला आहे.
4) भाजीपाला पिकांचे उत्पादन (वांगी व ढोबळी मिरची व ईतर भाजीपाला पिके ) ३० – ३५ % ने वाढले
5) आहे.
6) पाण्याचा ताण असेल किंवा जास्त पाण्यामध्येही या रोपांची वाढ चांगली होते.
7) रोपांची वाढ जोमदार असल्यामुळे एकरी रोपे २० – २५ % कमी लागतात.
8) भाजीपाला उत्पादन घेताना किटकनाशक व बुरशीनाशक यावरील खर्च ३० टक्के नी कमी झाला आहे.

फायद्याची व आरोग्यदायी..!



अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. यशवंत जगदाळे.
प्रकल्प प्रमुख, भाजीपाला गुणवत्ता केंद्र, कृषी विज्ञान केंद्र, बारामती
०२११२-२५५५२७, ९६२३३८४२८७